# बृहन्मुंबई महानगरपालिका

**नगर अभियंता मध्यवर्ती कार्यालय**

क्र.नअ/7547/ओडी/आसेप्र दि.29.07.2025

## - सूचना पत्र -

जाहिरात क्र. नअ/11852/ आसेप्र दि. 14.10.2024 अन्वये, बृहन्मुंबई महानगरपालिकेतील दुय्यम अभियंता (स्थापत्य/ यांत्रिकी व विद्युत) तसेच कनिष्ठ अभियंता (स्थापत्य/ यांत्रिकी व विद्युत) या संवर्गातील एकूण 690 रिक्त पदे भरण्याकरिता ऑनलाईन परीक्षा दि.09.02.2025, दि.02.03.2025, दि.03.03.2025, दि.08.03.2025, दि.13.05.2025 व दि.14.05.2025 रोजी महाराष्ट्र राज्यातील विविध परीक्षा केंद्रांवर संपन्न झालेली आहे.

दुय्यम अभियंता (स्थापत्य) संवर्गाचा निकाल दि.18.06.2025 रोजी प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर संवर्गाकरिता घेण्यात आलेल्या ऑनलाईन परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार, प्रवर्गनिहाय एकुण 226 उपलब्ध उमेदवारांची पडताळणीसापेक्ष तात्पुरती सामाईक निवड यादी क्र.नअ/ 4779/ आसेप्र दि.14.07.2025 अन्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

उपरोक्त नमूद केल्यानुसार तात्पुरती सामाईक निवड यादीमधील एकुण-226 उमेदवारांची खालील तक्ता-'अ' येथे नमूद केल्याप्रमाणे सर्व मूळ शैक्षणिक प्रमाणपत्रे तसेच इतर आवश्यक कागदपत्रांची/ प्रमाणपत्रांची पडताळणी दि.01.08.2025 ते दि.12.08.2025 या कालावधीमध्ये (कार्यालयीन दिवशी), खालील नमूद ठिकाणी सकाळी 11.00 ते सायंकाळी 6.00 यावेळेत करण्यात येणार आहे. यास्तव, उमेदवारांस सर्व संबंधित कागदपत्रांसह खालील नमूद ठिकाणी तक्ता-'अ' येथे नमूद दिनांक व वेळेस उपस्थित राहण्याचे निर्देश देण्यात येत आहेत. तद्अनुषंगाने दि.25.07.2025 रोजी आपण ऑनलाईन अर्जामध्ये नमूद केलेल्या ई-मेल आयडीवर कळविण्यात आले आहे. उमेदवाराने खालील तक्त्यात नमुद केलेल्या वेळेस व दिनांकादिवशीच पडताळणीकरिता उपस्थित राहणे बंधनकारक आहे. पडताळणीकरिता अनुपस्थित राहणा-या उमेदवारांचे नाव निवड यादीमधून कमी करण्यात येईल. याची कृपया नोंद घ्यावी.

| | |
|---|---|
| **कागदपत्रे पडताळणीकरिता उपस्थित राहावयाचे ठिकाण** | **बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय,<br>जुनी इमारत, दुसरा मजला, सभागृह क्र.1,<br>महानगरपालिका मार्ग, फोर्ट,<br>मुंबई- 400 001** |

**तक्ता - 'अ'**

| दिवस | तात्पुरत्या निवड यादीतील खालील अ.क्र. वरील उमेदवार | उमेदवारांची संख्या | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|---|
| 1 | 1 ते 30 | 30 | दि.01.08.2025 | सकाळी 11.00 वाजता |
| 2 | 31 ते 60 | 30 | दि.04.08.2025 | सकाळी 11.00 वाजता |
| 3 | 61 ते 90 | 30 | दि.05.08.2025 | सकाळी 11.00 वाजता |
| 4 | 91 ते 120 | 30 | दि.06.08.2025 | सकाळी 11.00 वाजता |
| 5 | 121 ते 150 | 30 | दि.07.08.2025 | सकाळी 11.00 वाजता |
| 6 | 151 ते 180 | 30 | दि.08.08.2025 | सकाळी 11.00 वाजता |
| 7 | 181 ते 210 | 30 | दि.11.08.2025 | सकाळी 11.00 वाजता |
| 8 | 211 ते 226 | 16 | दि.12.08.2025 | सकाळी 11.00 वाजता |

टिप - दिव्यांग उमेदवारांना नियोजित स्थळी उपस्थित राहण्यास संबंधित दिवसरोजी होणारा विलंब गृहित धरण्यात आलेला आहे.

**बृहन्मुंबई महानगरपालिकेतील दुय्यम अभियंता (स्थापत्य) या संवर्गातील सरळसेवा भरतीप्रक्रिया 2024-25 अंतर्गत उमेदवारांची नियुक्ती करण्यापूर्वी पडताळणी करावयाच्या दस्तऐवजांची तपासणी सूची**

| अ.क्र. | मूळ प्रती तसेच त्याच्या छायांकित प्रती |
|---|---|
| 1 | ऑन लाईन अर्ज, ई-मेल द्वारा प्राप्त झालेल्या प्रस्तुत पत्राची प्रत |
| 2 | सुस्पष्ट फोटो असलेले ओळखपत्र (उदा. मूळ पॅन कार्ड, आधार कार्ड, वाहन परवाना, निवडणूक ओळखपत्र, पारपत्र वा इतर ओळखपत्र |
| 3 | शाळा सोडल्याचा दाखला |
| 4 | जन्म दाखला |
| 5 | अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) (दोन्ही बाजूंची छायांकित प्रत) |
| 6 | एस.एस.सी.गुणपत्रिका, उत्तीर्णचे प्रमाणपत्र.(दोन्ही बाजूंची छायांकित प्रत) |
| 7 | 100 गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय असलेली तत्सम परीक्षा (उच्चस्तर/निम्नस्तर) उत्तीर्ण प्रमाणपत्र |
| 8 | एच.एस.सी. गुणपत्रिका उत्तीर्णचे प्रमाणपत्र.(दोन्ही बाजूंची छायांकित प्रत) |
| 9 | पदवी परीक्षेच्या सर्व सत्र/वर्षाच्या गुणपत्रिका, उत्तीर्ण प्रमाणपत्र, विद्यापीठाचे प्रमाणपत्र व छायांकित गुणपत्रिका. (दोन्ही बाजूंची छायांकित प्रत) |
| 10 | जातीचे प्रमाणपत्र |
| 11 | जात वैधता प्रमाणपत्र |
| 12 | अजा, अज व खुल्या प्रवर्गातील महिला आरक्षणाचा लाभ घेणारे उमेदवार वगळता सर्व मागासप्रवर्गातील उमेदवारांनी सक्षम प्राधिका-यांनी दिलेले वैध नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र मिळण्याकरीता सादर केलेला परिशिष्ट – 2, अर्ज व सोबत जोडण्यात आलेल्या सर्व कागदपत्रांची तहसिल कार्यालयामार्फत साक्षांकित केलेली छायांकित प्रत. |
| 13 | सरकारी नोकरीत असल्यास कार्यालय प्रमुखांचे ना-हरकत प्रमाणपत्र. |
| 14 | विवाहीत महिला उमेदवारांनी विवाह नोंदणी प्रमाणपत्र आणि राजपत्र. |
| 15 | Employment Exchange कडून प्राप्त झालेले रोजगार नोंदणी कार्ड असल्यास |
| 16 | खेळाडू उमेदवारांच्या बाबतीत, विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांनी क्रीडा प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत व खेळाडू संबंधित संवर्गासाठी पात्र ठरत असल्याबाबत प्रमाणित केलेले प्रमाणपत्र. |
| 17 | दिव्यांग उमेदवारांच्या बाबतीत, किमान 40% दिव्यांगत्वाचे शासकीय सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र. |
| 18 | अनाथ उमेदवारांच्या बाबतीत, सुधारित नमुन्यातील सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र |
| 19 | 4 पासपोर्ट साईज छायाचित्र(Photograph) |
| 20 | संबंधित अन्य प्रमाणपत्रे |

**टिप -**

| | |
|---|---|
| **1** | **प्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी पाठविलेले हे पत्र म्हणजे नियुक्ती पत्र नाही याची कृपया नोंद घ्यावी.** |
| **2** | **उपरोक्त नमूद केलेल्या दस्तऐवज तपासणी सूचीच्या अनुषंगाने सर्व प्रमाणपत्रांच्या मूळ प्रती तसेच स्वतः प्रमाणित केलेल्या छायांकित प्रतीचा संच सोबत आणावा.** |
| **3** | **आपल्या जन्मापासून ते आजमितीपर्यंतचे वास्तव्य केल्याचे सर्व पत्ते (कालावधीसह) तसेच, सदर कालावधीतील पोलीस स्थानक/पोलीस आयुक्त/पोलीस अधीक्षक यांचा पत्ता, दूरध्वनी क्रमांक आणि वैध ई-मेल आयडी इत्यादी माहिती या कार्यालयात प्रमाणपत्र पडताळणी वेळेस सादर करणे आवश्यक राहिल.** |

| | |
|---|---|
| 4 | **एस.एस.सी., एच.एस.सी, पदवी किंवा तत्सम परीक्षा एकापेक्षा अधिक प्रयत्नात उत्तीर्ण झालेले असल्यास उमेदवारांनी प्रत्येक प्रयत्नांची गुणपत्रिका व एकूण प्रयत्नांचे सर्व प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहिल.** |
| 5 | **दस्तऐवज पडताळणीवेळी सादर करावयाची प्रमाणपत्रे/कागदपत्रे संदर्भात अधिक विस्तृत स्वरुपातील माहितीकरीता कृपया सविस्तर जाहिरातीतील मुद्दा क्र. 15.7 अवलोकावे.** |

सही/- दि.29.07.2025
सह प्रमुख कर्मचारी अधिकारी
नगर अभियंता मध्यवर्ती कार्यालय